


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १९८ वा ❑ मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)




श्री तुळजाभवानी मंदिर तुळजापूर येथे नवरात्रीचा उत्सव होत आहे, नवरात्रीच्या पहिल्या माळेचे हे देवीचे मनमोहक रूप सर्व भविकांसाठी.

–श्री विजय सुनिल बोधले

## घरोघरी घटस्थापना करून नवरात्रोत्सवास प्रारंभ

### पहिल्याच माळेला पावसाची हजेरी; शहरासह जिल्ह्यातील माता मंदिरात भक्तांची गर्दी

**छत्रपती संभाजीनगर** – जय अंबे, दुर्गा माता की जय, सप्तशृंगी माता की जय, रेणुका माता की जय म्हणत सर्वत्र घरोघरी घटस्थापना करण्यात आली. तसेच शहरातील माता मंदिरातही घटस्थापना करून नवरात्र उत्सवास मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. सकाळीच पावसाने हजेरी लावली. मात्र तरीही अनेकांनी पावसात जाऊन मंदिरात दर्शन घेतले.

नवरात्र उत्सवानिमित्ताने आज पहाटे उठून महिलांनी घरोघरी रांगोळी काढून घटस्थापना करून आरती केली. पहिली माळ असल्याने आज पहाटेच अनेकांनी शहरातील कर्णपुरा माता मंदिर, बीड बायपास येथील रेणुका माता मंदिर, सिडको एन-७ येथील रेणुका माता मंदिर, हर्सूल येथील हरसिद्धी माता मंदिर, आकाशवाणी येथील दुर्गा माता मंदिरासह आदी माता मंदिरात दर्शनासाठी रांगा लावल्याचे बघायला मिळाले.





यावेळी मंदिराच्या वतीने देखील भाविकांसाठी दर्शनासाठी व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी शहरातील संपूर्ण माता मंदिरात मोठ्या संख्येने सकाळपासूनच भाविकांनी गर्दी केली होती. यावेळी जय मातेच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय झाले होते.

शहरातील कर्णपुरा माता मंदिरात पहाटेपासूनच पहिल्या माळेला भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. भर पावसात मोठ्या संख्येने भाविकांनी कर्णपुरा माता मंदिरात जाऊन देवीचे दर्शन घेतले. यावेळी तुळजाभवानी माता की जय... अशा जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय वातावरणात न्हाहून निघाला. यावेळी भाविकांना सुरळीत दर्शन घेता यावे यासाठी मंदिराच्या वतीने व्यवस्था करण्यात आली. तसेच आजपासून कर्णपुरा यात्रेला देखील सुरुवात झाली. आज यात्रेचा पहिला दिवस असल्याने अनेकांची दुकाने लावण्यासाठीही सकाळपासूनच लगबग सुरू झाली. भाविकांना सुरळीत दर्शन घेता यावे यासाठी आज पहाटेपासूनच पोलिसांनी देखील मंदिर परिसरात हजेरी लावून सहकार्य केले.

विधान परिषद माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते कर्णपुरा येथील आई तुळजाभवानीची महाआरती करण्यात आली.

शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त आई तुळजाभवानी मंदिर संस्थानात दानवे यांच्या हस्ते विधिवत परंपरेनुसार घटस्थापना करण्यात आली. शारदीय नवरात्र उत्सव शक्ती आणि प्रेरणा देणारा आहे.

याप्रसंगी शिवसेना नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले, उपजिल्हाप्रमुख किशोर कच्छवाह, संतोष मरमट, राजेंद्र दानवे, नंदू लबडे, महिला आघाडी जिल्हा समन्वयक विद्या अग्निहोत्री व राजश्री रागा उपस्थित होते.

विशेष लेख...

## नवरात्र : भारतीयांमध्ये एकता राखणारा उत्सव

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

भारतीय संस्कृतीमध्ये नवरात्र हा शक्तिची देवता दुर्गा आणि तिच्या विविध रूपांची आराधना करण्याचा एक प्रमुख सण आहे, जो नौ रात्रींचा काळ म्हणून ओळखला जातो. हा सण देशभरात विविध रूपांत साजरा केला जातो, भारतीयांमध्ये एकता राखणारा हा उत्सव आहे की ज्यात उपवास, प्रार्थना, सांस्कृतिक कार्यक्रम, गरबा आणि दांडिया यांचा समावेश असतो. हा सण वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे आणि यात अध्यात्म, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकतेचा संगम होतो. या सणाला केवळ धार्मिकच नाही तर सांस्कृतिक महत्त्व देखील आहे.नवरात्रीच्या काळात, लोक शक्ती, धैर्य आणि बुद्धीचे प्रतीक असलेल्या देवी दुर्गाच्या विविध रूपांची पूजा करतात. हा सण भक्ती आणि अध्यात्माचा काळ आहे, जो लोकांना त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रेरित करतो.

नवरात्र हा केवळ एक उत्सव नाही; तो एक एकात्मता निर्माण करणारी शक्ती आहे जी विविध पार्श्वभूमी, भाषा आणि संस्कृतीच्या लोकांना एकत्र आणते. हे भारताला अद्वितीय बनवणाऱ्या सांस्कृतिक समृद्धता आणि विविधतेवर प्रकाश टाकते. हा उत्सव साजरा करणाऱ्या सर्वांमध्ये एकता आणि सामायिक वारशाची भावना निर्माण करतो.नवरात्र हा भारताच्या सांस्कृतिक विविधतेचा आणि त्याच्या लोकांना बांधून ठेवणाऱ्या एकतेचा पुरावा आहे.

नवरात्र साजरी करताना, आपण भारताच्या विविध सांस्कृतिक रचनेचे सौंदर्य देखील साजरे करूया. हा सण एकता आणि भक्तीचा रंगीत धागा विणत राहो, आपल्या महान राष्ट्राची व्याख्या करणाऱ्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची आठवण करून देत राहो.

नवरात्र संपूर्ण भारतात प्रादेशिक विविधतेसह साजरी केली जाते जी उत्सवांना खोली आणि विविधता देते. भारतातील विविध राज्ये नवरात्र उत्सव साजरा करतात.

गुजरात: गरब्याची भूमी

नवरात्रीत गरबा आणि दांडिया रास नृत्याचे गुजरात हे एक रूप आहे. रंगीबेरंगी पोशाखात महिला आणि पुरुष मोकळ्या मैदानात एकत्र येतात, एकाग्र वर्तुळ बनवतात आणि पारंपारिक संगीताच्या तालबद्ध तालांवर नाचतात. गरब्याची ऊर्जा आणि उत्साह संसर्गजन्य आहे, ज्यामुळे तो भारतातील सर्वात प्रतिष्ठित नृत्य प्रकारांपैकी एक बनतो.

पश्चिम बंगाल: दुर्गा पूजा उत्साहात

पश्चिम बंगालमध्ये, नवरात्रीचा शेवट दुर्गापूजेच्या भव्य उत्सवात होतो. देवी दुर्गा आणि तिच्या दैवी सहकाऱ्यांच्या उत्कृष्ट मातीच्या मूर्ती ठेवण्यासाठी विस्तृत पंडाल (तात्पुरत्या रचना) उभारल्या जातात. हा उत्सव सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणुका आणि कलात्मक अभिव्यक्तींनी भरलेला असतो, जो बंगालच्या कला आणि भक्तीवरील प्रेमाचे प्रदर्शन करतो.

तमिळनाडू: गोलू प्रदर्शन

तामिळनाडूमध्ये नवरात्री हा गोलू म्हणून साजरा केला जातो. कुटुंबे पौराणिक कथा आणि सांस्कृतिक विषयांवर आधारित बाहुल्या आणि मूर्तींचे विविध प्रदर्शन आयोजित करतात. हा काळ सर्जनशीलता आणि कलात्मक अभिव्यक्तीचा असतो, कुटुंबे एकमेकांच्या घरी भेट देऊन त्यांच्या गोलू प्रदर्शनांचे कौतुक करतात.

पंजाब: रसलीलेचा उत्साह

पंजाबमधील नवरात्रोत्सवात भांगड्याच्या उत्साही आणि लयबद्ध चालींचा समावेश असतो. या उत्सवात रस लीलाची सुरुवात होते, जी भगवान कृष्ण आणि राधा यांच्यातील दैवी प्रेमाचे प्रतीक असलेली पारंपारिक नृत्यप्रकार आहे. ढोलाचे ताल आणि रंगीबेरंगी पोशाख उत्सवात उत्साह वाढवतात.

कोलकात्याचा एक विलक्षण अनुभव:

कोलकात्यातील दुर्गापूजा उत्सव केवळ भारतातच नाही तर जगभरात प्रसिद्ध आहेत. हे शहर गुंतागुंतीच्या पद्धतीने बनवलेल्या पंडाल, कलात्मक मूर्ती आणि सांस्कृतिक सादरीकरणांनी जिवंत होते. हा एक तल्लीन करणारा अनुभव आहे जो कोलकात्यातील लोकांच्या कलात्मक पराक्रमाचे आणि भक्तीचे प्रदर्शन करतो.

कोलकातामध्ये दुर्गा उत्सवाची उत्पत्ती १६ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. बंगालच्या जमीनदारांनी त्यांच्या संपत्ती आणि शक्तीचा अभिमान बाळगण्यासाठी त्यांच्या घरी दुर्गा पूजा सुरू केली. जसजशी वर्षे उलटत गेली तसतसे या कार्यक्रमाचे स्वरूप आले. कोलकातामध्ये अधिकाधिक कुटुंबांनी दुर्गा पूजा आयोजित करण्यास सुरुवात केली. त्यामुळे, बंगाली कॅलेंडरमध्ये हा एक महत्त्वाचा सण बनला.

उत्तर भारताची भक्ती:

उत्तर भारतात, भाविक नवरात्रीमध्ये उपवास करतात, मंदिरांना भेट देतात आणि प्रार्थना करतात. हा सण आध्यात्मिक चिंतन आणि भक्तीचा काळ आहे, ज्यामध्ये दुर्गा देवीच्या उपासनेला विशेष महत्त्व दिले जाते.

दक्षिण भारतातील सुंदर नृत्य:

दक्षिण भारतात, देवीला श्रद्धांजली म्हणून भरतनाट्यमसारखे शास्त्रीय नृत्य मंदिरांमध्ये सादर केले जाते. नृत्याद्वारे गुंतागुंतीच्या हालचाली आणि भावपूर्ण कथाकथन प्रेक्षकांना मोहित करते, एक दैवी संबंध निर्माण करते.

देशाच्या वेगवेगळ्या भागात या उत्सवाचे विविध प्रकार पाहणे किती सुंदर आहे. विधी आणि रीतिरिवाज वेगवेगळे असू शकतात परंतु संपूर्ण भारताला बांधून ठेवणारी एक गोष्ट म्हणजे नवरात्राची श्रद्धा, उत्साह आणि उत्सव होय.

## उपासना नारीशक्तीची

ज्योतिर्मय साहित्य

नवरात्री... आदिशक्तीच्या विजयाचा आणि पूजनाचा उत्सव. या नऊ दिवसांमध्ये आपण तिच्या विविध रूपांची आराधना करतो, तिच्या सामर्थ्याला आणि शौर्याला वंदन करतो.

ही देवीस्वरुपा केवळ मंदिरात नाही, ती आपल्या आजूबाजूलाही आहे, सृजन आणि सर्जनाचा अविष्कार घडवते आहे.



सौ. प्रिया धिरेन शहा, सांगली

पर्यावरणाच्या रक्षणासाठी ही शक्तीरुपा निःस्वार्थपणे काम करते आहे. नवरात्रीच्या निमित्ताने आपण त्यापैकी काही तपस्विनींची गाथा सांगणार आहोत. ज्यांनी पर्यावरणाचे रक्षण हेच आपले कर्तव्य मानून आपल्या कामातून समाजासमोर आदर्श उभा केला आहे. त्यांच्या जिद्दीची, संघर्षाची आणि यशाची ही कहाणी. चला, या शक्तीरूपांची आणि त्यांच्या प्रेरणादायी कार्याची ओळख करून घेऊ या!

निसर्ग वाचवणे हीच खरी सेवा मानणाऱ्या प्रियाताई सौ. प्रिया धिरेन शहा , सांगली

**लेखन**
**अपर्णा नागेश पाटील**

आज २१ व्या शतकात मानवाने प्रगती तर केली पण त्याबरोबच पर्यावरणावरचा असमतोल झाला आहे. शहरांची व्यापक वाढ, औद्योगिक क्रांती, वाहतुकीचा प्रचंड विस्तार, प्लास्टिकचा अतिरेक आणि जलस्रोतांचा ऱ्हास यामुळे निसर्ग संकटात सापडला आहे. हवेचे, पाण्याचे, नदीचे व जमिनीचे प्रदूषण वाढले आहे. त्याचे परिणाम हवामान बदलाचे संकट वारंवार दार ठोठावत आहे. धो धो कोसळणारा पाऊस हे ही निसर्गाच्या असंतुलनाचेच उदाहरण म्हणायला हवे. या सर्व पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाची चळवळ केवळ गरज नाही, तर अस्तित्वासाठीचा लढा आहे.

या पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीत आपले बहुमोल योगदान देणाऱ्या पर्यावरण प्रेमी कार्यकर्त्या सौ. प्रिया धीरेन शहा. मूळ पुण्यातील एका गुजराती कुटुंबात जन्म झालेल्या प्रियाताईचे शिक्षण पुण्यातील हुजूरपागा शाळेत झाले. २००१ मध्ये त्या लग्न होऊन सांगली येथील विश्रामबाग येथे स्थायिक झाल्या. लहानपणापासूनच निसर्गाची, स्वच्छतेची आवड असणाऱ्या प्रियाताईंना सभोवतालची अस्वच्छता अस्वस्थ करीत असे. अशातच त्या ''निसर्ग संवाद'' या संस्थेशी जोडल्या गेल्या आणि तेथूनच त्यांचा ''निसर्गाशी संवाद'' अधिक दृढ झाला.

''निसर्ग संवाद'' ही गेली १२ वर्षे कार्यरत असलेली सांगलीतील मिरज येथील निसर्ग प्रेम आणि पर्यावरण संवर्धन या उद्देशाने मिरज येथील राजेंद्र जोशी यांचे पुढाकारातून पर्यावरणसाठी कार्य करणारी संस्था. निसर्ग सहल, निसर्ग सायकल क्लब, वृक्ष संवर्धन, व्योम संवाद, निसर्ग मंडळे, माती गणपती कार्यशाळा, प्लॅस्टिक वापराबाबत जागृती, या सारखे अनेक उपक्रम राबवित असते. निसर्गाप्रती असलेल्या प्रेमामुळे आणि आवडीने प्रियाताई या निसर्ग सहलीत सहभागी होत असत. निसर्ग सहलीत आकाश दर्शन, वृक्षारोपण, जंगल, शेत बाग, नदीकाठ इ. ठिकाणी होणाऱ्या या सहलीतूनच त्यांच्या पर्यावरण विषयक कार्याला सुरुवात झाली .

''निसर्ग संवाद'' दर महिन्याला चालणे, सायकल चालवणे यासारखे उपक्रम राबवत असताना आपल्या निसर्ग सहलीतून लोकजागराचे ही काम करीत असे. सहलीला जाताना आम्ही सोबत एक पोते जवळ बाळगून आजूबाजूचा कचरा वेचत सभोवतालचा परिसर स्वच्छ करीत असतो. सायकल फेरीत पर्यावरण रक्षण करणारे फलक सायकलीवर लावलेले असतात. स्वच्छतेचे, पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी विविध उपक्रम व्याख्यानांचेही आयोजन केले जाते. नोव्हेंबर ते मे महिन्यादरम्यान व्योम संवाद अंतर्गत आकाश दर्शन, उल्का वर्षाव , ग्रह दर्शन इ. चे ही आयोजन करून निसर्गाच्या सौंदर्याची ओळख करून दिली जाते. पर्यावरणपूरक गणेश मूर्ती कार्यशाळा आयोजित करून धार्मिक उत्सवही निसर्गस्नेही करण्याचा प्रयत्न त्या करतात.

पर्यावरण संवर्धन जागृतीसाठी विविध शाळा, महाविद्यालये अशा ठिकाणी निसर्ग मंडळे स्थापन करून हसत खेळत निसर्ग वर्ग, प्रकृतीची पाठशाळा इ उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये जागृतीचे काम प्रियाताई व त्यांचे सहकारी अनेक वर्षांपासून करीत आहेत.

निसर्गाशी हितगुज करताना हिरव्यागार झाडी, स्वच्छ, निर्मळ झुळझुळणारे झरे, नद्यांचे पाणी हे बघत असतानाच मध्येच दिसणाऱ्या प्लास्टीकच्या पिशव्या, त्यामुळे होणारे अडसर, निसर्गाच्या सौंदर्याला कुरूप करीत आहेत हे पाहून दुःख होत असे. सांगलीत वारंवार नदीला येणारे पूर यालाही बहुतांशी कारण प्लॅस्टिकच ठरत आहे. प्लॅस्टिक निसर्गासाठी सोयीचे नसून ते निसर्ग विनाशाचे एक शस्त्र असल्याची जाणीव झाली आणि पर्यावरण रक्षणासाठी प्लॅस्टिक त्याग करायलाच हवे या जाणिवेतून त्यांनी प्लास्टिक निर्मुलन चळवळीत ''निसर्ग संवाद'' संस्थेसोबत '' पृथ्वी झिरो वेस्ट फाउंडेशन'' या संस्थेच्या कामातही स्वत:ला वाहून घेतले.

प्लास्टीक वापर म्हणजे भविष्यातील प्रदूषणाची गुंतवणूक या जाणिवेतून प्लॅस्टिक निर्मुलन जागृती चळवळ राबवली जाते. बाजारपेठेत, शाळा, हॉटेल अशा दैनंदिन व्यवहारात प्लास्टिकचा अतिरेक दिसतो. हा प्रश्न सोडविण्यासाठी दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी प्लास्टिक संकलन मोहीम सुरू केली आहे. सांगली, मिरज, कुपवाड व हरीपुर या परिसरात विविध भागांतून प्लास्टिक सोबतच ई – कचरा , थर्माकोल, इ. विघटन न होणाऱ्या वस्तूंचे संकलन केले जाते व ते पुढे रिसायकलींग साठी पाठवले जाते. आज पर्यंत ''पृथ्वी झीरो वेस्ट फाउंडेशन'' आठ हजार किलो प्लास्टिक कचरा आणि दहा हजार किलो ई-वेस्ट कचरा लँडफिलमधून वळवण्यात येऊन, पुनर्वापर करण्यात आला आहे. ज्यामुळे एक लाख किलो कार्बन उत्सर्जन वाचले ज्यामुळे पर्यावरणाची हानी कमी झाली आहे. या सर्व कार्यात एक योद्धा म्हणून प्रियाताई आपले मोलाचे योगदान देत आहेत.

शाळा, महाविद्यालये, हॉस्पिटल तसेच महिला भिशी गटात जाऊन त्या प्रबोधन करतात हळदी कुंकू अशाघरगुती कार्यक्रमात कापडी पिशव्या भेट देत प्लॅस्टिक ऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करण्यासाठी त्या जागृती करीत आहेत. घरातील जुन्या साड्या पासून कापडी पिशव्या शिवून घेऊन त्यांनी अनेक भाजीवाले, फळवाले यांना प्लास्टीक पिशवी ऐवजी कापडी पिशवी देण्यास प्रवृत्त केले आहे. आठवडे बाजारात चहासाठी प्लास्टिक कप वापरामुळे होणाऱ्या कचऱ्या पासून बचावासाठी त्यांनी रोटरी क्लब च्या मदतीने सर्व भाजीवाले / फळवाले यांना स्टील कपचे वाटप करून प्रबोधन केले आहे.

''निसर्ग वाचवणे हीच खरी सेवा आहे'' या भावनेतून माझा प्रवास सुरू झाला मात्र लहान मुलांमध्ये जागृती करणे सोपे आहे पण मोठ्यांना समजावणे अवघड.. प्रिया ताई यांनी बोलताना एक खंतही व्यक्त केली.

***

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - ५१



Typ आपले 'वास्तुशास्त्र पेंटींग' हे नक्षत्र आणि आवश्यक माहिती व संदर्भावर आधारित आहे. 'सुरपालमुनि विरचित्त वृक्षायुर्वेद' या ग्रंथाच्या संदर्भानुसार, वामन पुराणात कोणत्या देवतेपासून कोणते वृक्ष निर्माण झालेले आहेत, याची विस्तृत माहिती दिलेली आहे. काहींची माहिती आपण वाचली तर आपणांस वृक्ष आणि मानव यांचा ऋणानुबंध ध्यानात येईल.

जेव्हा भगवान श्री विष्णूच्या नाभितून कमळाची उत्पत्ती झाली, तेव्हा अश्विन महिना सुरु होता. त्याच वेळी इतरही अन्य देवतांच्या विभिन्न अवयवापासून अनेक प्रकारच्या जातींचे वृक्ष निर्माण झाले. म्हणून त्या त्या वृक्षांवर त्या त्या देवतांचे विशेष प्रेम असते. कामदेवाच्या हाताच्या अग्रांपासून कदम्बाची उत्पत्ती झाली. मणिभद्रापासून वड, शिवाच्या हृदयापासून धोत्रा, ब्रह्मदेवाच्या देहाच्या मध्यभागांतून खैर, विश्वकर्म्याच्या देहापासून कंटकी, पार्वतीच्या करतलापासून कुंद गुल्म, गणपतीच्या पोटातून सिन्धुवारका, यमराजाच्या दक्षिणापार्श्व भागापासून कृष्ण औदुंबर, रुद्र देवतेपासून वासक, स्कंद अर्थात कार्तिक स्वामी पासून बन्धुजीवा, सूर्यापासून अश्वत्थ, कात्यायनी पासून शर्मा, लक्ष्मीच्या हातांपासून बिल्व, शेषनागाच्या शेपटी व पाठी पासून श्वेत-शाम दुर्वा, साध्य देवतेच्या हृदयापासून हस्तिचंदन यांचा उद्भव झाला.

आपल्या 'वास्तुशास्त्र पेंटींग मध्ये, कुंडली नुसार ज्या ज्या देवतांचे उल्लेख येतात, त्यांच्या आवडत्या वृक्षाच्या 'पंचांगां' चा विचार आपण आपल्या 'पेंटींग' मध्ये करतो. आपण आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीसोबत जसे अधिक जिव्हाळ्याने सुसंवाद साधतो, त्याच भावनेतून या वृक्षांच्या 'पंचांगां'च्या घटकांचा चित्रकारांच्या आणि रंगायोजनाच्या रुपाने अंतर्भाव करतो.

आपल्या कुटुंबियांची आपल्या नोकरी - व्यवसायाची आणि आपल्या सुप्त स्वप्नांची सूक्ष्म वा तपशीलवार नोंद 'या' आकारांकडे असते. त्यामुळेच या 'पेंटींग द्वारे जातकाला सकारात्मकच लाभ झाल्याची निरिक्षणे आहेत.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......

---


पहाटेच्या पारी
तुळशीला पाणी
नगरात घुमे
साधुसंतांची वाणी ||२६७||

पहाटेच्या पारी
हंबरते गाय
पाजते वासराला
लेकुरवाळी माय ||२६८||

---

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## सर जो तेरा चकराये...




ज्योतिर्मय साहित्य

जय आणि वीरू त्याला ऐकू जाईल अशा पद्धतीने जेल में सुरंग बन रही हैं असं बोलतात. हरिराम ते अगदी कान देऊन ऐकतो. तो ज्या माणसाची दाढी करत असतो, त्याची दाढी आणि अर्धवट कापलेली मिशी सोडून देऊन जेलरला (असरानी) ही बातमी सांगायला धावतो. मग पुढील प्रसंग फारच बहारदार आहे. अंग्रेजोंके जमानेके जेलर असलेल्या असरानीला ते चांगलीच अद्दल घडवतात. असरानीने पण त्याची भूमिका फारच बहारदार आणि जिवंत केली आहे.



राम नगरकर हे नाभिक समाजातील. ते प्रसिद्ध विनोदी नट होते. त्यांनी लिहिलेले रामनगरी हे पुस्तक अत्यंत रोचक आणि गमतीदार तसेच हृदयस्पर्शी प्रसंगांनी भरलेले आहे. ते एकदा तरी जरूर वाचावं असं आहे.या पुस्तकाला पु ल देशपांडे यांची प्रस्तावना आहे. या पुस्तकावरून रामनगरी या नावाचा हिंदी चित्रपटही निघाला होता. या पुस्तकात राम नगरकर म्हणतात, नाभिक म्हणजे ना- भीक आम्ही भीक मागणार नाही. काम करून, लोकांची हजामत करून पैसे मिळवू.


कोणी कितीही मोठा माणूस असो, तो न्हाव्यापुढे आपली मान तुकवतोच. वर सुरुवातीला उल्लेख केलेल्या सर जो तेरा चकराये या गाण्यात एक कडवे आहे

नौकर हो या मालिक
लीडर हो या पब्लिक
अपने आगे सभी झुके हैं
क्या राजा क्या सैनिक

त्यांच्यापुढे जो जाईल त्याला मान झुकवावीच लागते. पण तुमचे जड झालेले डोके तो मसाज करून हलके करून देतो. केस पांढरे झाले असतील तर कलप लावून देतो. दाढी, मिशा इ सगळे व्यवस्थित करून तुमचे रुपडेच पालटून टाकतो. हजामत करणे हा वाक्प्रचार मराठीत वेगळ्या अर्थाने देखील वापरला जातो. एखाद्याची चांगली खरडपट्टी काढणे या अर्थाने तो वापरतात. बऱ्याच वेळा हा आशय व्यक्त करण्यासाठी बिनपाण्याने हजामत केली असे म्हटले जाते. नाभिक समाजातील शिवा काशीद याने आपल्या प्राणांचे बलिदान देऊन शिवाजी महाराजांचे प्राण वाचवल्याचे आपल्याला माहिती आहे. तर संत सेना महाराज हे वारकरी संप्रदायातील थोर संत होऊन गेले. ते नेहमी विठ्ठल भक्तीत रममाण झालेले असत. त्यांचा एक अभंग प्रसिद्ध आहे.

आम्ही वारीक वारीक, करू हजामत बारीक
विवेक दर्पण आईना दावू, वैराग्य चिमटा हालवू
उदक शांती डोई घोळू, अहंकाराची शेंडी पिळू
भावार्थाच्या बगला झाडू, काम क्रोध नखे काढू
चौवर्णा देउनी हात, सेना राहिला निवांत.

नाभिकांच्या कर्माला संत सेना महाराजांनी किती उंचीवर नेऊन ठेवले आहे ! त्यांनी सांगितलेल्या या गोष्टी प्रत्येक साधकाने करायच्या ठरवल्या तर परमार्थाची वाटचाल सुकर होईल.



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


## मुमुक्षुलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

मनाच्या श्लोकात पण अनुतापावर समर्थानी आपले विचार प्रगट केले आहेत. मुमुक्षु पणाची दोन अंगे आहेत. एकीकडे आतापर्यन्त घालवलेल्या जीवनातील अनुताप आणि त्याचबरोबर आत्मज्ञाना बद्दल तळतळ ही मुमुक्षुपणाची दोन अंगे आहेत. अनुतापाने पूर्वीच्या जीवन पद्धतीत खुपच बदल होतो. म्हणून तर साधुसंत मुमुक्षपणाला ''नवीन जन्म म्हणतात. या नव्याने जन्मलेल्या जगात मुमुक्षु संतांची संगत धरतो व श्रेष्ठ पदाला पोहचतो. मित्रांनो, समर्थानी हा समास ४४ ओव्यांच्या मध्ये गुंफला आहे. आपण तर समाजात आजूबाजूला घडत असलेल्या घटना नेहमीच पहातो. पण अज्ञानाची झापड असल्याने स्वतः मध्ये सुधारणा करत नाहीत व समस्यांच्या खोल गर्तेत काही लोक बुडतातात. हे तर नको आहे, निकोप निष्कलंक समाज हवा आहे आणि या साठी तर आपली भारतीय संस्कृती परंपरा महत्वाची आहे. निकोप समाजरचनेसाठी भारतीय परंपरेचे अवलोकन, आचरण, वाचन, मनन, चिंतन परत, परत होणे गरजेचे आहे.

आता आपण ओवी नुसार मुमुक्षु लक्षण समासाचा अभ्यास करू या. जो मनुष्य स्वैर विचाराचा आहे. पण जेव्हा त्याच्यावर सांसारिक आपत्ती येते तेव्हा तो जागा होतो. त्याला पश्चाताप होतो संसाराची आसक्ति सुटते. पुढे कधीतरी त्याला सत्पुरुषाचा ऊपदेश पटतो. जे कर्म करत होता ते वाईट आहे हे त्यालाच पटते.''संसाराचा सोस आता.बास झाला'' असे त्याला वापते. आता उरलेला काळ तरी सार्थकी लावावा असे त्याला वाटते. बद्धाला पश्चाताप झाला म्हणजे त्यांच्या मनाची कशी अवस्था होते याचे वास्तव वर्णन **(क्रमशः)**

## सत्संगतीच्या योगे मन पैक्यावर गुंतून राहात नाही



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

संतांमध्ये प्रचंड सामर्थ्य असते; ते बोलतील ते खरे होते. वाचासिद्धी म्हणतात ती हीच. या सिद्धीचा उपयोग आपणसुद्धा करून घेऊ शकतो; परंतु भगवत्सेवा करावी आणि त्याबद्दल पगार घ्यावा, तसे हे होते. कामधेनूवर ओझे टाकावे हे बरे वाटेना म्हणून, वाटेने घोडा येत होता तो घेतला आणि कामधेनू देऊन टाकली, तशासारखे होते. जे सुख चिरकाल टिकणारे नाही ते घेऊन काय करायचे ? हाडांची काडे करून स्वर्गसुख हाती आले, पण कालांतराने ते नाश पावणार; मग ते घेऊन काय करायचे ?

पैक्यासारख्या निर्जीव वस्तूत आपले मन किती गुंतून राहते ! पैसा हा भुतासारखा आहे; त्याच्याकडून काम करवून घेतले तर तो फार उपयोगी आहे. पण ते न केले तर तो उरावर बसतो! आपण प्रापंचिक माणसे; आपण पैसा साठविला तर गैर नाही, पण त्याचा आधार न वाटावा. पैशाचा आधार आहे असे वाटणे म्हणजे भगवंताचा आधार नाही असे वाटणे होय. आपल्याजवळचा पैसा आपण होऊन कुणाला द्यावा असे मी म्हणत नाही. पण चोराने तो चोरून नेला तर रडत बसू नये, किंवा कुणी मागायला आला तर त्याला 'नाही' म्हणू नये. त्याला काहीतरी द्यावेच. पैसा प्रपंचाला पुरेसा असावा. म्हणजे किती ? तर पेन्शन असेल त्यांना रोजच्या निर्वाहापुरता असला म्हणजे पुरेसा झाला; आणि पेन्शन नसेल त्यांना साधारण मध्यम स्थितीत दहा-पंधरा वर्षे पुरेल इतका असला म्हणजे पुरेसा झाला. याला अमुक एक असा हिशेब सांगता येणार नाही. आपल्या प्रपंचाला जेवढा जरूर आहे तेवढा पैसा आपल्याला मिळाला, की बस्स झाले. श्रीमंतीला पुष्कळ पैसा लागतो असे थोडेच आहे ? आपल्याला अडचण नाही पडली की आपली श्रीमंतीच आहे ! पैशाच्या बाबतीत आपण प्रयत्न मात्र आग्रहाने करावा, आणि नंतर होईल तसे होऊ द्यावे. आपण आतून निष्काम, निर्लोभ आणि निरिच्छ असावे. दुसऱ्याचे द्रव्य मला यावे अशी बुद्धी कधीही ठेवू नये. ज्याच्याजवळ पैसा विपुल आहे त्याला श्रीमंत अगर सावकार म्हणता येईल; ज्याच्याजवळ विद्वता आहे त्याला विद्वान् म्हणता येईल; ज्याच्याजवळ शेत आहे त्याला शेतकरी म्हणता येईल; परंतु यांच्यापैकी कोणाला मोठा म्हणता येईलच असे नाही. सावकार कंजूष असेल, विद्वान् गर्विष्ठ असेल, किंवा शेतकरी असाच दुर्गुणी असेल. ज्याच्याजवळ सर्व गुण एकसमयावच्छेदेकरून असतील तोच खरा मोठा होय. सर्व गुण एका भगवंताच्या ठिकाणीच असू शकतील. म्हणून त्याला ज्यांनी आपलासा केला तेच खरे मोठे बनतात. अशा लोकांना संत म्हणतात. आपण संतांचे होऊन राहावे, त्यात आपले कल्याण आहे. सत्संगतीपासून सद्विचार आणि सद्भावना प्राप्त होतात. ज्याचे विचार चांगले तो मनुष्य खरा चांगला होय; आणि जिथे भगवंताचे अनुसंधान आहे तिथे राहणे हीच खरी सत्संगती होय. पैशाचे नाव अर्थ, पण तो करतो मोठा अनर्थ.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते?

ज्योतिर्मय साहित्य

आणखी कलियुगाची ४२७००० वर्षे शिल्लक आहेत पण त्या आधीच हे जग नष्ट होऊ शकेल. हे भीषण सत्य महादेवांनी जाणले.बरे एक पृथ्वी नष्ट झाली की, ब्रम्हांडात त्यामागे अनेक ग्रह तारे सुद्धा नष्ट होतील. म्हणून हा विनाश थांबविण्यासाठी व हे जग वाचविण्या साठी ''कळी गिळी तसे धाव वेगी'' अशी आज्ञा आपले शिष्य मच्छिंद्रनाथ यांना केली. त्यांनी हीच आज्ञा गोरक्षनाथांना ,त्यांनी ती गहनी नाथांना, व त्यांनी तीच आज्ञा निवृत्तीनाथांना व शेवटी ती ज्ञानेश्वर महाराज यांना अग्रेषीत केली.

ज्ञानेश्वर माऊली यांनी भगवद्गीता वरील टिका ग्रंथ भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) लिहुन त्या आज्ञेचे पालन केले.व मी या जगाचे रक्षण केले हे निःसंदिग्धपणे सांगितले.

परि साचची गुरुनाथे/ निमित्त करुनी माते/ प्रबंधव्याजे जगाते /रखिले जाणा/
/१८/१७६५

आता प्रश्न पडतो की ज्ञानेश्वरी जगाचे रक्षण कसे काय करील? त्यात काय शस्त्रे लपविली आहेत काय? किंवा ज्ञानेश्वरी या ग्रंथात काय शस्त्रनिर्मितीचे सूत्रे दिली आहेत काय? मग ज्ञानेश्वरी ग्रंथ या जगाचे रक्षण कसे काय करणार?

जेव्हा ज्ञानेश्वर माऊली निःसंदिग्ध पणे म्हणतात ''होय मी हे जग वाचविले आहे'' तेव्हा त्यावर आपण शंका घेऊन उपयोगी नाही. पण हे जग वाचण्यासाठी काय करावे ?ग्रंथाची पारायण केले म्हणजे जग वाचेल काय? या प्रश्नाचे उत्तर हुडकताना असे लक्षात येते की ज्ञानेश्वरी हा ग्रंथ केवळ पारायणा साठी नसून तो त्यात दिलेले प्रयोग गिरवण्या साठी आहे.

पौराणिक काळात भारत हा सुजलाम सुफलाम असा देश होता. यास सोने की चिडिया असेही संबोधल्या जायचे. धन धान्य ऐश्वर्य याची विपुलता सचोटी प्रामाणिकपणा शौर्य पराक्रम आणि अध्यात्म याची उत्तम सांगड त्याकाळी झालेली आपणास दिसते. हे सर्व ऐश्वर्य भारतात होते पण त्यावेळेस चा भारत हा आजच्या राजकीय भारताच्या सीमा रेषे एवढाच संकुचित नव्हता तर तो तीन खंडांनी एकत्रित म्हणजे आफ्रिका युरोप आणि आशिया या तीन खंड एकत्रित असलेला प्रचंड मोठा भूभाग होता. त्यास अजनाभ खंड म्हणत. महा प्रलया नंतर भगवान मनु हे रशियातील कॉकेशस पर्वताजवळ प्रथम राज्य करू लागले. हे सर्व ऐश्वर्य राहण्याचे, टिकण्याचे कारण असे होते की, त्याकाळी राजे लोक हे राजर्षी योग प्रवीण होते. व्यवहारात राजाची कर्तव्य पार पडत असताना ते राजर्षी योग धारी होते. योगाच्या या सामर्थ्याने शत्रू असण्याची शक्यताच निर्माण होत नसे. कारण योग सामर्थ्याने मैत्र भाव हा पसरला जायचा. आणि शत्रूच्या मनात यांचे वर हल्ला करावा असे देखील कोणाच्या मनात येत नसे. जोवर परंपरेने राजे लोक राजर्षी योग धारी होते तोवर देश सु संपन्न सुजलाम सुफलाम असा राहिला. हा राजर्षी योग सुरुवातीस भगवान शंभूंनी विष्णू यांना दिला. म्हणून योगाचे आद्य प्रवर्तक समर्थ सिद्ध गुरु, आदी गुरु म्हणून महादेवा कडे पाहिले जाते. भगवान विष्णूंनी हा योग सूर्यास दिला. आणि सूर्य नारायणांनी हा योग मनु ना दिला आणि मनू पासून हा योग क्रमशः त्यांच्या पुढील पिढीत अवतरीत झाला. जैनांचे तीर्थंकर ऋषभदेव ही मनु नंतर तीन-चार पिढ्यामध्येच येतात. प्रभू श्रीराम हे मनुच्या १२६व्या पिढीत जन्मले. मनूला एक पुत्र इक्शांकू नावाचा व एक कन्या ईला नावाची झाली.इक्शांकू यांच्या पासून पुढील पिढीही सूर्यवंशी म्हणून ओळखली जाऊ लागली

तर मनूची मुलगी ईला हिच्यापासून चंद्रवंश स्थापित झाला. या चंद्र वंशातच कौरव पांडव आणि भगवान श्रीकृष्ण हेही जन्मले.

**(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**आगतोऽहं सुखेनैव द्वारं ते भवतारिणि।**
**उद्घाट्य द्वारमेतद्धि शरणं मे ददातु ते।।६५।।**

हे भवतारिणी, तुझ्या दारी सुखाने आलो. हे द्वार उघड. मला तुझे शरण दे.

**नेत्रद्वये सलीलं मे कथं तद् कथयाम्यहम्।**
**क्षीणता वेदना नष्टादृष्ट्वा मातृमुखं मम।।६६।।**

माझ्या दोन्ही नेत्रांत पाणी आहे, कसे ते सांगू? माझ्या मातेचे मुख पाहून क्षीणता, वेदना नष्ट झाली.

**स्तोत्रस्य पठनं चैव चापराधक्षमापनम्।**
**तथा चात्मनिवेदनं रोदनं भजनं पुनः।।६७।।**

स्तोत्र पठण, अपराधक्षमापन, आत्मनिवेदन, रोदन, भजन पुनः पुनः करतोय.

**तव विस्मरणं मातः कठोरं मरणादपि।**
**वरेण्यं मरणं किन्तु विस्मरणं न सह्यते।।६८।।**

हे माते, तुझे विस्मरण मरणाहूनही कठीण आहे. मरण निवडावे, पण तुझे विस्मरण सहन होत नाही.

**न ज्वालयति दुःखं वै यथा विस्मरणं तव।**
**स्मरानि त्वां महामाये कारुण्यनिधिरेणुके।।६९।।**

जसे तुझे विस्मरण जाळते, तसे दुःखही जाळीत नाही. हे महामाये, कारुण्यनिधी रेणुके, मी तुझे स्मरण करावे.

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

स्वार्थ केला रघुपती मति माझी आपुलिशी करावी सकळत यजुनी भावे कास तुझी धरावी. समर्थांची गोड करुणाष्टके .यात आपण शरण जाण्याची गोड करुणाष्टके आहेत.अशी शरणागती आपण का घ्यावी याची ३ कारणे आहेत. हा विचार मी मानसं शास्त्राने केला आहे १ आपल्या जीवनात निर्माण झालेल्या दुःखाची जाणीव २ हे दुःख आपण आपल्या प्रयत्नाने दूर करू शकत नाहीत याची जाणीव हवी ३

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

संसार नावात दुख आहे हे कळाले पाहिजे.संसारातील दुःख बद्दल आपण बोलत नाहीत.संसार या नावाने असणाऱ्या दुःख याची गोष्ट करीत आहोत.

विभीषण म्हणे तुमच्या शिवाय मी कोणास शरण जावे?

भगवान म्हणतात हा मला शरण आला त्याचे रक्षण मी करतो.कारण जगात शरन्य(म्हणजे ज्याला शरण जावे तो) केवळ मी आहे.स्वतःला वेगळे न समजता मला एकरूप होणे हे शरण होय.

बिभीषण आला.चरणावर मस्तक ठेवले सर्व लोकात तुम्हीच एकमेव शरण्य आहात. मी सर्व सोडून आलो.मी लंकेचा परित्याग केला.मी मित्राना सोडले. धन सोडले.असा निःसंग होऊन मी आलो.सर्वांना हे आवडले. रामानी त्यास तुला रावण वधानंतर लंकेच्या गादीवर बसविण्याचे वचन दिले. लक्ष्मण म्हणे तुम्ही असे वचन लगेच द्यायला नको होते. कारण समजा तुम्हाला रावणही शरण आला तर तुम्ही त्यास मारू शकणार नाही. मग याला गादीवर कसे बसविणार? **(क्रमशः)**



## आरोग्य संजीवनी

### रक्ताभिसरण संस्थेचे शुद्धीकरण गरजेचे आहे, कारण...

ज्योतिर्मय साहित्य

रक्ताभिसरण सुरळीत होत नसेल तर प्राथमिक लक्षणे म्हणून हातापायाला मुंग्या, सूज व वेदना असा प्रकार होतो. इथेच सावध होऊन जर योग्य ती उपाययोजना केली नाही तर रक्तदाब () वाढून बीपीची गोळी चालू होऊ शकते, रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेज तयार होऊन अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, अॅटॅक अशा प्रकारांना सामोरे जावे लागू शकते, तसेच रक्ताभिसरणाने प्रत्येक अवयवांना जर ऑक्सिजन व न्युट्रीशन व्यवस्थितपणे पोहोचले नाही तर अवयवही खराब होऊ लागतात आणि तब्येतीच्या तक्रारी सुरू होतात.

रक्ताभिसरण सुरळीत होण्यासाठी उपाययोजना -

१) नियमित व्यायाम करणे - व्यायाम करताना जो घाम येतो त्यामुळे रक्तातील विषारी द्रव्ये घामावाटे बाहेर पडून रक्त पातळ होऊन रक्ताभिसरण सुरळीत होते. तसेच व्यायाम करताना जो दम लागतो त्यामुळे हृदयाचे पंपिंग होऊन रक्ताभिसरण सुरळीत व्हायला मदत होते. रक्ताभिसरण सुरळीत झाल्यामुळेच व्यायाम केल्याने उत्साही वाटते.

२) आहारात दही-ताकाचा समावेश - -१२ जीवनसत्त्व सूक्ष्म रक्ताभिसरणासाठी महत्वाचे असते त्यासाठी आहारात दही-ताकाचा समावेश असावा. कारण त्यातून बॅक्टेरीया मिळतात आणि बॅक्टेरीया असल्याशिवाय -१२ जीवनसत्त्व बनत नाही. शिवाय -१२ जीवनसत्त्व असल्याशिवाय हिमोग्लोबिन ही बनत नाही.

३) रक्तवाहिन्यांची लवचिकता वाढवणे - रक्तवाहिन्यांची लवचिकता कमी झाली तरच रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे तयार होतात, रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉक तयार होतात, रक्तवाहिन्या अरुंद होतात. त्यामुळे रक्तवाहिन्यांची लवचिकता वाढावी म्हणून आहारातून ओमेगा-३ फॅटी ॲसिड घ्यावे. त्यासाठी आहारात जवस, आक्रोड, बदाम, मासे, तूप तसेच स्वयंपाकासाठी लाकडी घाण्याचे तेल वापरावे.

४) रक्ताभिसरण संस्थेचे शुद्धीकरण करणे - दर सहा महिन्यांनी रक्ताभिसरण संस्थेचे वेळोवेळी शुद्धीकरण करून रक्तवाहिन्यांमधील अडथळे दूर करत राहिल्यास रक्तवाहिन्या अरुंद होऊन रक्तदाबाची (ब्लड प्रेशर) गोळी चालू होणार नाही, रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे निर्माण होऊन हातापायांना मुंग्या, सूज, वेदना अशी प्राथमिक लक्षणे जाणवणार नाहीत. जाणवत असतील तर ती दूर होतील शिवाय रक्तवाहिन्यांमधील अडथळे वाढत जाऊन अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी करायची वेळच येणार नाही तसेच रक्ताभिसरणासंबंधित गंभीर आजारांपासून बचावही होईल.

त्यामुळे निरोगी राहण्यासाठी किमान दर सहा महिन्यातून एकदा संपूर्ण शरीर शुद्धीकरण (बॉडी डेटोक्सिफिकेशन) करणे नितांत गरजेचे आहे. समस्येवर उपाय म्हणून तोडगा सुचविणेही महत्वाचे आहे. त्यासाठी तोडगा म्हणून आम्ही . ढेरेस हर्बल डिटॉक्स किट आवर्जून सुचवतो. यामध्ये पचनसंस्थेच्या, रक्ताभिसरणसंस्थेच्या सर्व्हिसिंग सोबत संपूर्ण शरीराचेच सर्व्हिसिंग होते. संपूर्ण शरीर शुद्धीकरणाने (बॉडी डेटोक्सिफिकेशन) आपल्या छोट्या-मोठ्या आरोग्यविषयक समस्या दूर तर होतातच पण आपली संपूर्ण शरीरयंत्रणाही सुरळीत चालू लागते आणि आपल्याला हलकं-हलकं व उत्साही वाटू लागते. विषारी द्रव्ये बाहेर काढणे गरजेचेच आहेच पण विषारी द्रव्ये शरीरात तयार होऊ नये म्हणून सवयीतील, आहारातील, दिनचर्येतील चुका दुरुस्त करणेही गरजेचे आहे -**(क्रमशः)**

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

# संगीता ठलाल आज सह्याद्री वाहिनीवर

**ज्योतिर्मय साहित्य**

**कुरखेडा** – साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता संतोष ठलाल मु. देऊळगाव / कुरखेडा जि.गडचिरोली येथे राहणाऱ्या ह्या सामान्य गृहिणी, शेतकरी महिला आहेत. इयत्ता चौथ्या वर्गात शिकत असताना त्यांनी लिखाणाचा छंद जोपासला. तशीच त्यांना सामाजिक क्षेत्रात सुद्धा आवड होती.लग्नानंतर एकत्र कुटुंबात राहून शेतीचे कामं तसेच कुटुंब सांभाळून ज्वलंत विषयावर व सामाजिक विषयावर विविध वृतपत्रात, दिवाळी अंकात, पुरवणीत त्यांनी लिखाण केले आहेत. सोबतच बऱ्याच पुस्तकांना शुभेच्छा पत्र सुद्धा लिहून दिले आहेत. बऱ्याच पुस्तकांवर समीक्षा केली आहे. तसेच विविध वृतपत्रात त्यांचे लिहिलेले साहित्य प्रकाशित होत असतात. त्यांची अनेक कार्यक्रमात सन्मानपूर्वक उपस्थिती दिसते, बऱ्याच कार्यक्रमात त्यांनी पदे भुषविले आहेत व त्यांनी चांगल्या कार्याला पाठींबा सुद्धा दिला आहे. त्यांचे शासकीय व इतर संस्थाकडून अनेक सत्कार सुद्धा झाले आहेत. त्यांचा दैनंदिन सकाळ सदर असलेला ''विचारधारा'' समाजप्रबोधन करणारा व अत्यंत लोकप्रिय झालेला आहे. सोबतच ''रानभाज्यांच्या जगात'' ह्या उपक्रमामुळे त्यांची समाजात व साहित्य क्षेत्रात विशेष ओळख आहे. म्हणून गेल्या ३०तारखेला केंद्र सरकारच्या साहित्य अकादमी दिल्लीच्या वतीने तसेच माध्यमिक आश्रम शाळा चांदाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या चांदाळा या गावी ''ग्रामालोक'' या कार्यक्रमात त्यांना निमंत्रित करण्यात आले होते. व रानभाज्यांवर आणि वन औषधीवर त्याचे कथन झाले आहेत. सोबतच त्यांनी नि:स्वार्थ भावनेने कशाचीही अपेक्षा न करता अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत.




प्रचंड संघर्षमय जीवनप्रवास बघून गेल्या काही दिवसांपूर्वी त्यांची नि:स्वार्थ साहित्य सेवा व सामाजिक कार्य बघून रेडिओ आकाशवाणी केंद्र नागपूर येथे त्यांची मुलाखत सुध्दा झालेली आहे. दुर्गम भागातील महिला कलागुणांच्या माध्यमातून व समाजाच्या हितासाठी पुढाकार घेऊन माणुसकीच्या नात्याने कार्य करणाऱ्या साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांचे समाजासाठी असलेले भरीव योगदान व साहित्य सेवा बघून नागपूर प्रस्तुती दूरदर्शन सह्याद्री वाहिनीने त्यांची दखल घेतली आहे. सोबतच मु.डव्वा जि. गोंदिया येथील सरपंच योगेश्वरी चौधरी यांच्या सुद्धा कार्याची दखल घेतली आहे. या मुलाखतीचे प्रसारण दि.२३ तारखेला, वार मंगळवार दुपारी ठीक १२ वाजता ''संकल्प सामाजिक जाणीवेचा'' या विषयावर दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवर संगीता ठलाल यांची मुलाखत होणार आहे. निर्माती मीनल पाठराबे, मुलाखतकार प्रज्ञा जिवनकर तसेच दूरदर्शन सह्याद्री वाहिनीचे संगीता ठलाल यांनी आभार मानले. संगीता ठलाल सारख्या सामान्य महिलेची मुलाखत दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवर होणार हे कळतात सर्वच स्तराहून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. ही दखल सामाजिक क्षेत्रासाठी, साहित्य क्षेत्रासाठीच नव्हे तर जिल्ह्यासाठी सुद्धा अभिमानाची बाब आहे.

# 'विकसित महाराष्ट्र २०४७-युवा व क्रीडा संवाद'ची नागपुरातून सुरुवात

**ज्योतिर्मय साहित्य**

**नागपूर** – गडचिरोली जिल्ह्यातील आष्टी येथील राष्ट्रीय धनुर्धर जय ठेंबले यास आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी आवश्यक साधन सुविधा मिळण्याची मागणी थेट क्रीडा व युवककल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्याकडे केली. त्याची दखल घेत जिल्हा क्रीडा संकुलाच्या माध्यमातून या सुविधा जय यांच्यासह खेळाडूंना देण्यात याव्या, अशा सूचना व यानंतर क्रीडा प्रशिक्षक, संघटक, खेळाडुंचे पालक, पंच, दिव्यांग खेळाडू आदी सर्वांच्या सूचना व मतं ऐकून घेत त्याचा अंतर्भाव राज्याच्या क्रीडा धोरणात करण्यात येईल, असा विश्वास स्वत: मंत्री देत असल्याचे चित्र आज विभागीय क्रीडा संकुलात बघायला मिळाले. औचित्य होते राज्यातील पहिल्या 'विकसित महाराष्ट्र २०४७- युवा व क्रीडा संवादाचे.




क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्यावतीने राज्याच्या क्रीडा क्षेत्र विकासासाठी महत्त्वपूर्ण सूचना प्राप्त करून घेण्याकरिता सर्व विभागीय मुख्यालयात 'विकसित महाराष्ट्र २०४७-युवा व क्रीडा संवाद' उपक्रम राबविण्यात येत आहे. नागपूर विभागाचा हा संवाद विभागीय क्रीडा संकुल मानकापूर येथे आयोजित करण्यात आला.

नागपूर विभागाच्या सहा जिल्ह्यातील खेळाडू, प्रशिक्षक, संघटक, पंच आणि क्रीडा क्षेत्रात कार्य करणाऱ्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी या संवादात हिरीरीने सहभाग घेऊन राज्याच्या क्रीडा धोरणासाठी आपल्या सूचना व मते थेट क्रीडा मंत्र्यांसमोर मांडल्या. विना मध्यंतर सलग चार तास चाललेल्या या संवादात शासन आणि लाभार्थी यांच्यातच थेट संवाद झाला. सुरुवातीला मंत्री ॲड. कोकाटे यांनी या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट करतांना क्रीडा व युवककल्याण क्षेत्रात कार्यरत सर्व घटकांच्या अमूल्य सूचना ऐकून घेत त्यातून राज्यासाठी एक सर्वसमावेशक धोरण ठरविण्यात येणार असल्याचे सांगितले.

या संवादाची सुरुवातच गडचिरोली जिल्ह्यातील स्क्वॅश खेळाचे संघटक सरोजित मंडल यांनी खेळाडूंसाठी प्रवास व निवासी भत्त्यापोटी शासनाकडून वार्षिक निधी उपलब्ध होण्याबाबत केलेल्या सूचनेने झाली. याच जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी महिलांनी सुरु केलेल्या 'आधार विश्व फाऊंडेशन'च्या प्रमुख गिता हिंगे यांनी तरुणांसाठी शासनाकडून समुपदेशनाची व्यवस्था उपलब्ध होण्याची मांडलेली सूचना, राज्यशासनाचा शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त चंद्रपूर येथील ज्येष्ठ खेळाडू राजेश नायडू यांनी शिवछत्रपती पुरस्कार सुरु करण्याची केलेली सूचना, नागपूर येथील क्रीडा संघटक पियुष आंबुलकर यांनी विविध शासन निर्णयांचा संदर्भ देत विविध स्पर्धा आयोजनासाठी वाढीव निधी आणि प्रशिक्षक व क्रीडापटूंसाठी वाढीव मानधनाची केलेली सूचना तसेच आंतरराष्ट्रीय दिव्यांग क्रिकेटपटू गुरुदास राऊत यांनी दिव्यांग खेळाडुंसाठी विभागीय क्रीडा संकुलात दिव्यांग क्रीडा संकूल असावे आणि या खेळाडुंनाही शासकीय नोकऱ्या व पुरस्कारांमध्ये प्राधान्य देण्याची केलेली सूचना आणि यासर्वांना मंत्री ॲड. कोकाटे यांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद व आश्वासनाने या संवादाचे लक्ष वेधून गेले. बहूतेक वेळी सूचनांना प्रतिसाद देतांना त्यांनी चार ते पाच विषयांमध्ये विभागाकडून लवकरच शासननिर्णय निर्गमित करण्यात येणार असल्याची माहिती दिली. क्रीडा विभागातील अधिकारी कर्मचाऱ्याच्या रिक्त जागांबाबत बिंदूनामावलीची प्रक्रिया पूर्ण होताच जवळपास एक हजार पद भरण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी उद्योग क्षेत्राकडून सीएसआरमधून निधी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

प्रत्येक जिल्ह्यातील तीन ते चार प्रतिनिधींनी या संवादात सहभाग घेवून आपल्या सूचना व मत नोंदवली. नागपूर विभागापासून सुरु झालेला हा युवा व क्रीडा संवाद कार्यक्रम राज्यातील अन्य विभागांमध्ये आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे सहसंचालक सुधीर मोरे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

राज्य शासनाच्या पहिल्या क्रीडा धोरणापासून ते राज्यातील क्रीडा प्रबोधिनी, क्रीडा संकूल, क्रीडा पुरस्कार, मिशन लक्षवेध आदींबाबत त्यांनी माहिती दिली.

यावेळी प्रभारी क्रीडा उपसंचालक पल्लवी धात्रक यांच्यासह विभागातील जिल्हा क्रीडा अधिकारी, आंतरराष्ट्रीय बुद्धीबळपटू दिव्या देशमुख आणि विविध क्रीडा प्रकारातील निवडक आंतरराष्ट्रीय क्रीडापटू उपस्थित होते.

# प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर यांना भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पुरस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – पिंपळनेरचे भूमिपूत्र कवी तथा बालसाहित्यिक प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर ( प्रदिप बाबुलाल पगारे) हे रमाईसुत या टोपन नावाने कविता, लेख व साहित्य लेखन करतात. त्यांच्या ३० वर्षातील शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पुरस्कार २०२५ पुरस्काराने पुणे येथे सन्मानित करण्यात येणार आहे.

डॉ. मणिभाई देसाई मानवसेवा ट्रस्ट, क्रीडा मंत्रालय भारत सरकार, निति आयोग दिल्ली संलग्नीत डॉ रविंद्र भोळे आरोग्य सेवा संस्थेच्या पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या ५ ऑक्टेबर २०२५ रोजी विविध जेष्ठ मान्यवरांच्या हस्ते कवी- प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर यांना भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पुरस्कार २०२५



पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे नुकतेच संस्थेचे निवडपत्र प्राप्त झाले आहे.


प्रदिपगुरुजी हे पेशाने शिक्षक असून नुकतेच त्यांच्या दोन्ही पायांवर मोठी शस्त्रक्रिया झालेली आहे. अंथरुणाला खिळवून असतांनाही त्यांनी या काळात यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त दोन काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. त्यापैकी ''बालमित्रांची छान छान गाणी'' हा बालकाव्यसंग्रह प्रकाशीत झाला असून लाल पाणी मिळे रक्त या काव्यसंग्रहाच्या लेखनाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच या काळात त्यांनी ३०० पेक्षा जास्त कवितेची रचना करून १५० - २०० सन्मानपत्रे प्राप्त केली आहेत. तसेच विविध ऑनलाइन काव्यसंमेलनात सहभाग घेऊन विविध पारितोषीके प्राप्त केली आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल आजारपणाच्या काळात यांना ४-५ पुरस्कारांनी देखील गौरवण्यात आलेले आहे.


गुरुजींनी आतापर्यंत ४५ वेळा रक्तदान केलेले असून समाजाचा सहभाग म्हणून १५-१७ लाखांपर्यन्त लोकवर्गणीतून विविध शाळांचा कायापालट केलेला आहे. यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यास आमचा मानाचा मुजरा.











**या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।**



# आचरणात आणण्यासारखे खूप काही

ज्योतिर्मय साहित्य

हे विश्वजननी श्रीजगदंबामाते सर्व भक्तांना नि या विश्वाला तूच तारी आता ! श्रीतुळजाभवानीदेवी नवरात्राच्या सर्वांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा! आई राधा! उदोउदो !

या अनंत ब्रह्मांडाची निर्मिती झाल्यानंतर पृथ्वीवर परत ऋषी, मुनींवर, सर्वसामान्य जनांवर अत्याचार करणाऱ्या दुष्ट राक्षसांचा नाश करण्यासाठी श्रीतुळजाभवानी देवीने प्रत्येक युगी, प्रत्येक शतकात वेगवेगळ्या रुपात अवतार घेवून दूष्टांचा नाश केलेला आहे तसेच, दूष्ट, क्रूर व पापी, अधर्मी राक्षसांचा, दूष्ट, क्रूर लोकांचा नाश अंबादेवी विविध रुपे घेवून करीत असते. त्याबद्दलची कथा प्राकृत सप्तशती ग्रंथात सविस्तर लिहिलेली आहे. त्यात श्रीतुळजाभवानी मातेने श्री महासरस्वती देवीचा अवतार घेवून शुंभ व निशुंभ राक्षसांचा वध केला. कालिकादेवीचा अवतार घेऊन चंडमुंड या राक्षसांचा वध केल्यामुळे, अंबामातेने त्या देवीचे नामकरण ‘‘चामुंडा‘‘ असे केले. तसेच, कालिकादेवीने रक्तबीज नावाच्या राक्षसाचा वध केला. पण, त्याच्यावर शस्त्र चालवले असता, त्याच्या शरीरातून उडणा-या प्रत्येक थेंबापासून नवीन रक्तबीज राक्षस निर्माण होत असत. त्यामुळे, स्वर्ग, मृत्यू व पाताळ तिन्ही लोकात असंख्य रक्तबीज राक्षस निर्माण झाले. त्यामुळे, कालिकामातेला प्रश्न पडला की या असंख्य रक्तबीज राक्षसांना मारायचे कसे? तेव्हा, तुळजाभवानी मातेने कालिकामातेला सांगितले की, रक्त उडाले की, सर्व रक्त पिऊन टाक

त्याप्रमाणे, कालिकामाता त्या रक्तबीज राक्षसाचे रक्त जमिनीवर पडायच्या आधीच ते सर्व रक्त ती गिळून टाकू लागली. कित्येक राक्षसांना ती तिच्या भल्या मोठ्या तोंडातच गिळंकृत करु लागली. अशा प्रकारे सर्व दैत्य आटोपले. तसेच, रक्तबीजाचे सर्व रक्त पिले. अशा प्रकारे रक्तबीजाचा अंत झाला. अशा प्रकारे श्री तुळजाभवानी देवीने कधी कालिकादेवी होऊन कधी चंडिकादेवी होऊन, कधी महालक्ष्मीदेवी होवून, कधी रेणुकादेवी होऊन, कधी योगेश्वरीदेवी होऊन कधी महासरस्वती होऊन शेकडों हजारो, लाखो कोट्यवधी राक्षसांचा वध केला आहे. मुख्य म्हणजे, अंबामातेने अत्यंत क्रूर महादूष्ट अशा महिषासुर राक्षसांचा वध करण्यासाठी श्रीजगदंबामातेचा म्हणजेच श्रीतुळजाभवानी मातेचा अवतार घेतला. त्यासाठी, श्रीतुळजाभवानी मातेला सर्व देवांनी



आपली आपली शक्ती,आयुधे, शस्त्रे, दिव्यतेज दिले. या सर्व शक्तींमुळे, अस्त्रांमुळे श्रीजगदंबामातेने जमिनीवर व आकाशात महाक्रूर महिषासूर राक्षसाबरोबर रात्रंदिवस घनघोर युध्द केले. तो मायावी राक्षस होता. देवीने त्याला मारायचे म्हंटले की, तो राक्षस लगेच महिष व्हायचं, क्षणात रेडा व्हायचा, क्षणात हत्ती व्हायचा, क्षणात नाहीसा व्हायचा. मग श्री

**मधुकर निलेगावकर**
**पुणे**

तुळजाभवानी मातेने सुध्दा त्याचप्रकारे त्याच्याशी युध्द आरंभिले आणि अनेक दिवसांनंतर देवीने त्याला आकाशात गरगर फिरवून जमिनीवर आपटले तेव्हा, त्या महाभयंकर, अजस्त्र राक्षसाचा अंत झाला. सर्व देवांनी मग, स्वर्गातून श्रीजगदंबामातेवर पुष्पवृष्टी केली. तिचा जयजयकार केला. म्हणून, श्रीजगदंबामातेचे नाव महिषासुरमर्दिनी म्हणून विख्यात झाले. श्रीतुळजाभवानी देवीने तिच्या भक्तांना सांगितले की, जेव्हा जेव्हा या धरेवर अधर्म वाढेल तेव्हा तेव्हा प्रगट होवून अधर्मी लोकांचा, दूष्टांचा नाश करेन असे श्रीजगदंबामातेने तिच्या भक्तांना सांगितले आहे.

प्रत्येक युगात आणि प्रत्येक शतकात श्रीतुळजाभवानी माता कोणत्याही रुपात भक्तांच्या मदतीला धावून येते. त्यासाठी, श्रीजगदंबामातेवर भक्तांची खूप गाढ श्रध्दा असायला पाहिजे. श्री तुळजाभवानीमातेची अंतर्मनाने एकनिष्ठपणे भक्ती केली पाहिजे.

हे जगदंबामाते या पृथ्वीतलावर भारतदेशी


कलियुगातील एकविसाव्या शतकातील राक्षसांहूनही क्रूर अशी दूष्कृत्ये करणारी माणसाच्या रुपातील मनुष्यदैत्यांनी जगात, भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात खूप हाहाकार माजवला आहे.

लहान मुलेमुली, महिला यांच्यावर कांही मनुष्यरुपी दूष्ट दैत्य खूप अनन्वित अत्याचार करीत आहेत.त्यामुळे, सर्वसामान्य महिला, मुलेमुली, जनता व तुझे भक्त खूप भयभीत झाले आहेत. त्यांचा वाली कोणीही राहिलेला नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यकारभार सांभाळणा-या शासकीय यंत्रणांचा गुन्हेगारांवर,

दूष्ट शक्तींवर वचक राहिलेला नाही. त्यामुळे, रोज या जगात निरनिराळ्या गुन्ह्यांचे व गुन्हेगारांचे प्रमाण वाढतच चालले आहे. याला धरबंद, पायबंद कोणीच घालू शकले नाही. हे जगदंबामाते तुझ्याशिवाय या दूष्ट, महाक्रूर मनुष्यदैत्यांचा वध कोणीही करु शकत नाही. म्हणून, हे जगदंबामाते तुझ्याचरणी माझे व तुझ्या सर्व भक्तांचे साष्टांग दंडवत आहे . या पृथ्वीतलावर अनेक देशांमध्ये  व भारतदेशी विशेषतः महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात जंगलकटाई झालेली आहे. तसेच, होत आहे. तसेच, सर्वं प्रकारच्या वाहनांचे फार मोठ्या प्रमाणात अतिभयानक प्रदूषण झाले आहे. व त्यांचे प्रमाण सातत्याने वाढतच चालले आहे. हे जगदंबामाते त्यामुळे, संपुर्ण विश्वातील मनुष्यांचे जीवन, निसर्गसृष्टी व पृथ्वीचे पर्यावरण संतुलन अस्थिर झालेले आहे. त्याकारणाने विश्वाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. करिता हे जगन्माते , जगदंबामाते तुझ्या सर्व भक्तांचे व सर्वसामान्य जनतेचे, संपूर्ण निसर्गसृष्टीचे रक्षण कर . तसेच, सर्व मनुष्यरुपी मनुष्यदैत्यांचा विनाश कर आणि परत या पृथ्वीतलावर निसर्गाचे, पर्यावरणाचे संतुलन स्थिर राहावे. तसेच, तुझ्या सर्व भक्तांना सर्व मानवजातीला सुखसमृध्द कर. त्यांची दू:खे, त्यांच्या वेदना, काळजी, भिती,चिंता सर्व समस्या नाहीशा कर अशी तुझ्या चरणी माझी कळकळीची नम्र प्रार्थना आहे व तुझ्या चरणी दंडवत आहे. श्री तुळजाभवानी माता नमः! श्री जगदंबामाता नम:! आई राधा उदोउदो! श्रीतुळजाभवानी देवीच्या कृपेने माझ्या हातून रचना झालेले याबाबतचे समर्पक असे धार्मिक गीत खालीलप्रमाणे सादर केले आहे.

‘‘महिषासुरमर्दिनी गीत‘‘
जय जय महिषासुरमर्दिनी
जय जय महिषासुरमर्दिनी
तव भक्तांचे रक्षण करण्या
दावी गे सामर्थ्य, शक्ती तुझी
दूष्ट, मनुष्यदैत्य माजले कलियुगी
थोडीशी ना उरली सुखाची सुगी
पूर्वयुगी तू चंडमुंड दैत्य मारीले
भूलोकीअवघ्या भक्तांसी सुखी केले
आबालवृद्ध, महिला, बाल मुलेमुली
एकविसाव्या शतकी बहू त्रासली गेली
महिषासुराधिक मनुष्यदैत्य बहू माजले
विनाश त्यांचा करण्या माते पाव सत्वरी
देवांचे, वसुंधरेचे रक्षण करण्यासी सदैव
धावलीस त्वरेने घेऊनी अस्त्रे,खड्गे करी
अंबामाते! आताही काळ पातला तैसा भूवरी
दंडवत मम तवचरणी! धाव घे माते सत्वरी

***



## दुसरी माळ

नमस्कार

काल आपण अत्यंत  पवित्र वातावरणात घराघरात  देवीची घटस्थापना केली. आज आपण श्रीक्षेत्र माहूर निवासात वास करणारी माता व परशुरामाची जननी श्री रेणुका मातेला ही शब्द रूपी माळ अर्पण करूया.

द्वितियेच्या दिवशी चौसष्ठ योगिनी एकत्र येतात.त्या सर्वजणी रेणूकामातेला, संकलामध्ये श्रेष्ठ असलेल्या परशुरामाच्या जननीला,जिने कस्तुरी मळवट भरला आहे. भांगात शेंदूर लावला आहे.तिचा सर्व योगिनी जयजयकार करत आहेत.

मातेला तांबूलाचा नैवेद्य अर्पण केला आहे.

विध्यवासिनी आई सर्वांच्या कल्याणासाठी शत्रुचा बिमोड करण्यासाठी सज्ज झाली आहे.तिने लाल रंगाची साडी परिधान केली आहे.लाल रंग हा शक्ती व चैतन्य देतो. लाल रंग हा उत्साहाचे प्रतिक आहे.आपण पण अत्यंत समर्पण भावनेने मातेला वंदन करू आपण आज कोणता बोध घेणार आहोत तर मातेच्या आशीर्वादाने आपल्या संसारात सतत चैतन्य निर्माण व्हावे.आपले कष्ट त्या कष्टातून मिळालेले वित्त हे नेहमी सचोटीने असावे. वाममार्गाच्या पैशाचा कधीही लोभ होणार नाही किंवा मला फक्त माझा कष्टाचाच पैसा घरात हवा. अशी विचारसरणी या नवरात्राच्या काळात मी करते ते मातेला जास्त प्रिय असेल. कष्टातून मिळालेले वित्त व त्या पैशाचे योग्य नियोजन करून गुंतवणूक करून आपली आर्थिक शक्ति वाढवली पाहिजे.कारण कोणती आपत्ती कधी येईल हे सांगता येत नाही.

**सौ.ऊज्वला धर्माधिकारी**
**पूणे**

करोना सारख्या महामारीची झळ आपण सगळ्यांनी अनुभवली आहे. तर खुल्या अर्थव्यवस्थेमुळे बाजारात अनेक प्रलोभने पहायला मिळतात. पैसा संपादन करायला वेळ लागतो पण तो जायला हजारो वाटा असतात. त्याला सतत बळी न पडता पैशाचे योग्य नियोजन करून देवीचे नवरात्र आपण अर्थपूर्ण करू शकतो. विनाकारण ऊधळपटीला आळा घालून अर्थपूर्ण नवरात्र उत्सव साजरा केला तर मातेला तो जास्त आवडेल.

भपका खोटा बडेजाव डीजेवरती लावलेली मोठमोठ्या आवाजातील कर्णकर्कश गाणी मातेला आवडत नाही.

संस्कार व संस्कृती जपत केलेली साधी पूजा देवीमातेला प्रसन्न करण्यासाठी पूरेशी आहे.

त्यासाठी मोठ्या प्रमाणावर अंगविक्षेप करत तरूणाईने जे देवीच्या नावावर  विभत्स प्रकार चालवले आहेत ते थांबवणे गरजेचे आहे. द्रव्यशक्तीचा जो अकारण बडेजाव थांबवून साधी पूजा केली तर माता तुम्हाला नक्कीच प्रसन्न होईल व भरभरून आशीर्वाद देईल.

या देवी सर्व भूतेशु लक्ष्मी रूपेणु संस्थिता
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः

## नवरात्र - आई जगदंबेची आरती

गाऊ या श्रीजगदंबेची महती
करू या सारे आईची आरती ।। धृ ।।

लेकरांवरी कृपा तव असुदे
दया दृष्टि आम्हावरती असुदे
आई तू दूर कर मनाची भ्रांती
करू या सारे आईची आरती ।।

गाऊ या श्रीजगदंबेची महती
करू या सारे आईची आरती ।। धृ ।।

लांडी-लबाडी ,फसवेगिरी आता
आई जगदंबे तू आमची त्राता
करी दूर आमच्या मनाची भीती
करू या सारे आईची आरती ।।

आई स्फूर्ती देशी अरूणदासाला
स्पर्श कृपेचा होवो माझ्या मनाला
शब्दातून सांगे जगदंबेची कीर्ती
करू या सारे आईची आरती ।।

गाऊ या श्रीजगदंबेची महती
करू या सारे आईची आरती ।। धृ ।।

**-कवी अरुणदास**

***

# भाविकांचे श्रद्धास्थान- चतुर्श्रृंगी देवी

ज्योतिर्मय साहित्य

पुण्याच्या सेनापती बापट मार्गावर चतु:शृंगी देवीचे मंदिर आहे. पुण्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे तसेच नवरात्रात व वर्षभराचे काळात येथे दर्शनासाठी भाविकांची गर्दी असते. मंदिराचा परिसर अतिशय स्वच्छ सुंदर व आकर्षक आहे.वरुन पुणे शहराचे विहंगम दर्शन होते. चतु:श्रृंगी देवी म्हणजे आदिशक्तीचे एकरूप आहे. नाशिक जिल्ह्यातील वणी येथील सप्तशृंगी देवी येथे प्रगटले आहे अशी आख्यायिका आहे.या देवीला अंबरेश्वरी देवी असंही म्हणतात.

मंदिराच्या नावाचा पहिला शब्द चतुः म्हणजे चार आणि म्हणून चतु:शृंगी म्हणजे चार शिखरे असलेला पर्वत. मंदिर खूप मोठं असून ९० फूट उंच आणि १२५ फूट रुंद आहे. हे मंदिर शक्ती आणि विश्वासाचे प्रतीक आहे. चतु:शृंगी मंदिराच्या परिसरातील पार्वतीनंदन गणपती आहे. मंदिरात बसून चाफेकर बंधूंनी रँडच्या वधाचा कट रचला होता. त्यावेळी त्यांनी या गणपतीचे आशीर्वाद घेतले, देवीची आराधनाही केली. आम्हाला या कटात यश मिळू दे अशी इच्छा व्यक्त केली. त्यात चाफेकरांना यश मिळालं. अशीही माहिती मिळते.

चतु:शृंगी देवी मंदिराला ऐतिहासिक पार्श्वभूमीही आहे. पेशव्यांच्या काळात ३०० वर्षांपूर्वी दुर्लभशेठ पितांबरदास महाजन नावाचे सावकार होते. ते नाशिकच्या वणीच्या सप्तशृंगी मातेचे परमभक्त होते. प्रत्येक चैत्र आणि अश्विन पौर्णिमेच्या दोन्ही नवरात्रोत्सवात ते त्याकाळी ३०० किलोमीटरचा प्रवास करून दर्शनासाठी जायचे आणि देवीची सेवा करायचे. त्यांनी अनेक वर्षे देवीची अविरत सेवा केली. मात्र, पुढे वृद्धापकाळाने त्यांना वणीला जाणे शक्य होत नव्हते. त्यामुळे देवीची सेवा करता येणार नसल्यामुळे त्यांना दु:ख झाले. त्यांनी एके दिवशी सप्तशृंगी देवीकडे प्रार्थना केली, तेव्हा देवीने त्यांचे दु:ख जाणले. सप्तशृंगी देवी त्यांच्या स्वप्नात प्रकट झाली आणि त्यांना म्हणाली, ‘तुम्ही माझ्याकडे येऊ शकत नसाल, तर मी तुमच्याकडे येईन आणि तुमच्याजवळच राहीन.‘ देवीने त्यांना पुण्याच्या वायव्येला असलेल्या डोंगरावर येऊन तिथे उत्खनन करायला, तसेच तिथे माझी मूर्ती मिळेल, असेही सांगितले. त्यांनी सांगितलेल्या ठिकाणी उत्खनन केल्यानंतर त्यांना छोट्याशा गुहेत तांदळास्वरूप मुखवटा मूर्ती मिळाली. त्याप्रमाणे भक्तासाठी ही देवी चतु:श्रृंगी नावाने प्रकट झाली.




१७६५ साली चैत्र पौर्णिमेच्या दिवशी देवी प्रकट झाली. पुढे त्यांनी त्या ठिकाणी मंदिर बांधले. मंदिराला अडीचशे वर्षांपेक्षा अधिक वर्षे झाली आहेत. अनगळ कुटुंबाची सातवी पिढी मंदिराची जबाबदारी सांभाळत आहे आणि मंदिरातील धार्मिक उपक्रम, उत्सवाचे नियोजन अनगळ कुटुंबीय पाहत आहेत.

मंदिरापर्यंत पोहोचण्यास भाविकांना अंदाजे दिडशे अधिक पायऱ्या चढून जावे लागते. मंदिराच्या डावीकडील पहिल्या टप्प्यावर श्रीगणेश मंदिर, तर उजवीकडील शेवटच्या टप्प्यावर दुर्गामातेचे मंदिर आहे. सर्वात शेवटी चतु:शृंगी देवीच्या मुख्य मंदिरात प्रवेश करता येतो. देवीचा गाभारा चांदीच्या नक्षीकामाने सजवलेला असून, देवीचे मुख वणीच्या सप्तशृंगी देवीप्रमाणे आहे. मंदिरातील नवरात्रोत्सव हा पाहण्यासारखा असतो आणि दसऱ्याच्या दिवशी आयोजित करण्यात येणारी सीमोल्लंघनाची मिरवणूक पाहण्यासारखी असते. या वर्षीही परंपरेनुसार २ आक्टो.गुरुवारी दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी सीमोल्लंघनाची पालखी मिरवणूक निघणार आहे. यामध्ये हेलिकॉप्टरमधून देवीच्या पालखीवर  पुष्पवृष्टी होणार असून आणि मिरवणुकीत कलाकारांचा समावेश असलेले कलावंत ढोल-ताशा पथकाचा सहभाग हे आकर्षण असणार आहे. तसेच, नगारा, चौघडा,  वाघ्या






मुरळीसह, देवीच्या सेवेकऱ्यांचाही सहभाग राहणार आहे. नवरात्राच्या काळात मंदिरामध्ये जवळपास ७० ते ७५ भजनी मंडळाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.या काळात येथे यात्राही भरत असते. भाविकांना दर्शनासाठी अडचण होऊ नये म्हणून भाविकांच्या रांगा व्यवस्थित व शिस्तीत राहणे तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना केली आहे.

नवरात्रात देवीचे दर्शन घेणे म्हणजे भाविकांना आनंदाची पर्वणीच असते.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559